# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ )*

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७.**
**दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६**
**Website:**www.unipune.ac.in.

**Board of Examinations & Evaluatio**
**Ganeshkhind,Pune-411007**
**Phone: 2025621398**
**E-mail:** bee@unipune.ac.in


**संदर्भ : परीक्षा/एस ॲण्ड टी/** ९६० **दिनांक :** २७/०६/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा आणि दादरा–नगर हवेली)

विषय : परीक्षा आयोजन, मूल्यमापन आणि अनुषंगिक सर्व प्रकारच्या त्रुटी, अडचणी आणि दुरूस्तीकरिता **Examination Services Portal** सुरू करणेबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, परीक्षा व मूल्यमापन मंडळाने परीक्षा व मूल्यमापनविषयक विद्यार्थीकेंद्रीत सर्व सेवा कागदविरहित करण्याच्या प्रक्रियेतील पुढचा टप्पा सुरू केला आहे. या संदर्भात जाहीर प्रकटन विद्यापीठ संकेतस्थळावर दिनांक १३ जून, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. परीक्षा, मूल्यमापन आणि निकाल तसेच निकालोत्तर अनेक त्रुटी या सुविधेमुळे अद्ययावत दुरूस्त होतील आणि पर्यायाने विद्यार्थी, महाविद्यालये व परिसंस्था यांना परीक्षा व मूल्यमापन संदर्भातील सर्व दुरूस्त्या, निर्णय किंवा इतर गोष्टीही कागदविरहित उपलब्ध होत आहेत.

तरी सर्व महाविद्यालये/परिसंस्था यांना निर्देशित करण्यात येत आहे की, परीक्षा व मूल्यमापन सेवा या पोर्टलविषयी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व परीक्षा मूल्यमापनात सहभागी व्यक्तींना अवगत करावे आणि इथून पुढे तात्काळ याच पोर्टलद्वारे आपण परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडे प्रस्ताव, अर्ज, विनंती सादर कराव्यात.

या पोर्टलमधून काही समस्या, त्रुटी हया छाननी व तालिनीकरण कक्षाच्या स्तरावरच निरसित होतील आणि ज्या गोष्टी प्रमाद समितीपुढे किंवा इतर अधिकार मंडळांकडून निरसित होणे अपेक्षित आहे, त्या तिकडे वर्ग होतील. त्यामुळे आता याच पोर्टलद्वारे प्रमादविषयक तक्रारी आणि त्याअंतर्गत सभा देखील आयोजित करण्यात येणार आहेत. प्रमादअंतर्गत

ऑनलाईन सभांचे आयोजन केल्यामुळे परीक्षा व मूल्यमापन मंडळ/महाविद्यालय/परिसंस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांचा वेळ आणि प्रशासकीय कामकाजापोटी महाविद्यालयांना सोसावा लागणारा खर्चही संपुष्टात येईल. या सुविधेचे आपण सर्वजण स्वागत कराल, अशी अपेक्षा आहे. परंतु त्यासंदर्भातील सर्वकष जागृती संबंधित सर्व घटकांत करून या प्रक्रियेची तात्काळ अंमलबजावणी आपल्या स्तरावर करावी, असे स्पष्ट करण्यात येत आहे. याकरिता ऑनलाईन लिंक grievance.unipune.ac.in अशी असून या संदर्भातील माहितीपुस्तिका (User Manual) सोबत जोडली आहे.

सदर ऑनलाईन पोर्टल दिनांक २३ जून, २०२५ पासून सर्व महाविद्यालये/परिसंस्थांकरिता कार्यान्वित करण्यात येत असून, सदर पोर्टलद्वारेच आपण ऑनलाईन अर्जप्रक्रिया आपल्या स्तरावरून सुरू करावी.

आपला,

( प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सेबत : वरीलप्रमाणे

# जाहीर प्रकटन

**परीक्षा नियोजन, मूल्यमापन, मूल्यनिर्धारण व विविध प्रमाणपत्रांसाठी ऑनलाईन अर्ज सुरू : दुय्यम गुणपत्रक/श्रेयांकपत्रक, पासिंग सर्टिफिकेट आणि परीक्षा गैरप्रकार, प्रमाद प्रकरणे निराकरण सुविधा उपलब्ध...**

परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सर्व उपविभागांमधील कार्यालयीन कामकाज कागदविरहित करण्याच्या प्रक्रियेत या अगोदर पदवी प्रमाणपत्र व ट्रान्सक्रिप्टसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. आता यासह दुय्यम गुणपत्रक/श्रेयांकपत्रक, पासिंग सर्टिफिकेटसाठी अर्ज करण्याची व सर्व कागदपत्रे ऑनलाईन जमा करण्याची सुविधा; तसेच परीक्षा नियोजन, मूल्यमापन, मूल्यनिर्धारण यासंदर्भातील त्रुटींसाठी संबंधित सर्व अर्ज, तसेच त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे ऑनलाईन जमा करण्याची सुविधाही दि. १२/०६/२०२५ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. ही ऑनलाईन सुविधा मा.कुलगुरू, प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते लोकार्पित करण्यात आली, यावेळी विद्यापीठाचे मा.प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, मा. प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, मा. अधिसभा सदस्य श्री. राहूल पाखरे, मा. उपकुलसचिव श्री. ज्ञानेश्वर साळुंके, श्री. प्रदीप कोळी, तसेच श्री. धनंजय शिंदे, डॉ. प्रविण येवले, श्रीमती सुप्रिया बारणे, श्री. विक्रम सनगर व इतर अधिकारी उपस्थित होते. परीक्षा विभागाचे कामकाज विद्यार्थीकेंद्री व कागदविरहित होण्यासाठी या सुविधा अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन मा.कुलगुरू यांनी केले.

यासंदर्भातील सर्वच त्रुटींसाठी संबंधितांस प्रत्यक्ष परीक्षा विभागात अथवा प्रमाद समितीसमोर कागदपत्रांसह हजर रहावे लागत असे. परंतु आता या दोन्ही सुविधांमुळे विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, महाविद्यालयीन कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी तसेच प्राचार्य/संचालक यांना परीक्षा विभागात उपरोक्त कोणत्याही कारणांसाठी प्रत्यक्ष येण्याची अथवा संबंधित कागदपत्रे (हार्ड कॉपी) विद्यापीठ परीक्षा विभागात प्रत्यक्ष सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

ऑनलाईन अर्जासंदर्भातील कार्यवाही आणि त्यासंदर्भातील सद्य:स्थिती विद्यार्थ्यांस किंवा महाविद्यालयास ऑनलाईन प्रदर्शित होईल. तसेच एसएमएसद्वारेही त्यांच्या अर्जाची किंवा त्यासंदर्भातील प्रक्रियेची सद्य:स्थिती संबंधितांस अवगत करण्यात येईल. ऑनलाईन अर्जात काही त्रुटी असल्यास तो अर्ज विद्यार्थ्यांस/महाविद्यालयास तात्काळ दुरूस्तीसाठी पाठवण्यात येईल आणि दुरूस्ती/त्रुटी दूर केल्यानंतर संबंधित अर्ज पुढील प्रक्रियेसाठी पुन्हा प्रविष्ट करण्यात येईल. काही प्रकरणे अनुषंगिक अनिवार्य कारणांमुळे तात्काळ निकालात निघणार नसतील, तर अशावेळी संबंधित विद्यार्थी/महाविद्यालयास तसा मेल प्राप्त होईल, परंतु या प्रकरणांचे समाधानही लवकरात लवकर करण्यात येईल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४८(५)(क) अन्वये प्रमाद समितीच्या संदर्भातील सर्व प्रकरणांची सुनावणीसुद्धा (विद्यार्थी परीक्षा गैरप्रकार वगळता) ऑनलाईन पद्धतीने करण्याची प्रक्रियाही कार्यान्वित करण्यात येत आहे. यामुळे महाविद्यालयीन प्रशासनाचा/प्राध्यापकांचा वेळ वाचेल आणि याबाबतच्या प्रवासाचा मानसिक त्रासही राहणार नाही.

प्रमादसंदर्भातील किंवा परीक्षा नियोजन व मूल्यमापन संदर्भातील सर्वच त्रुटी, दुरूस्ती अन्य बाबींसाठी केलेल्या अर्जाची स्थिती महाविद्यालयांस ऑनलाईन प्रदर्शित होईल. तसेच यासंदर्भातील सर्व टप्पे, उदा. प्रमाद सभेचे पत्र, त्यासंदर्भातील ऑनलाईन बैठकीचे वेळापत्रक, झालेले निर्णय, प्रमादचे दंडात्मक शुल्क हे सर्वच ऑनलाईन उपलब्ध करण्यात आले आहे.


तरी सर्व महाविद्यालये/परिसंस्थांच्या मा.प्राचार्य/संचालक यांना निर्देशित करण्यात येत आहे की, उपरोक्त ऑनलाईन सुविधांसंदर्भात विद्यार्थी, पालक, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व आपल्या प्रशासनास अवगत करावे आणि परीक्षा विभागातील कागदविरहीत कामकाजासाठी पूर्णत: सहकार्य करावे.


प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ


## Use Following Link to Fill the Application

**https://grievance.unipune.ac.in**




Click Create Application to register the application
3460
Grievance System
College
Create Application
Dashboard
Mark Entry
Log Out
Create Grievance Application
Select Grievance Type : *
Select Pattern : *
Please Upload College Letter : *
Please Enter Remark : *


Select Proper Grievance Type
Select Exam Pattern
Select Subject
Select Type
Select Application Type
Select Batch no, Prn
Upload Single Pdf
Enter Remark
Click Submit Button
******3460
Grievance System
College
Create Application
Dashboard
Mark Entry
Log Out
Create Grievance Application
Select Grievance Type : *
Internal/External Related Issue
Select Pattern : *
B.B.A. 2019 Credit Pattern
Select Subject : *
Select Paper Type : *
EXTERNAL
Select Application Type : *
Select PRN : *
Please Upload College Letter : *
Browse...
Please Enter Remark
Please Enter Remark : *
Test
Submit